९८

५ - पु. ५

॥ वन्देमातरम् ॥

# — शाहिरी डफ —

थाप ४ थी.

# सुधारणा

व

# देशस्थिती.

( आवृत्ती १ ली )

लेखक व प्रकाशक

शाहीर प्रल्हादराय जामखेडकर

मुद्रकः- द. वा. जोशी.

चैत्र शु॥१) मुल्य १ आणा. (शके १८५३

॥ जय हिंद्माता ॥

# शाहिरी डफ थाप ४ थी.

## " सुधारणा "

ले०-शाहीर प्रल्हादराय जामखेडकर

[ चाल- गुन्हेगारी धन्याची ]

अहा सुधारणा ही किती मजेदार ॥ ध्रु० ॥
ब्राह्मण धर्मची ठार बुडाला झाला भ्रष्टाकार।
संध्या स्नानें गेली सारी वाढे पापाचार ॥ १ ॥
सर्वच ह्मणती क्षत्रिय आह्मी हाती नसे तल्वार ।
महाराष्ट्रातिल मर्दपणाचे नांव बुडविले पार ॥ २ ॥
वैश्य वर्णची उरला नाही उदीम झाला ठार।
जो तो उठला करू लागला परदेशी व्यापार ॥ ३ ॥
मर्द असुनि ते मिशा काढिती तोंड करी गुल्जार ।
मर्दांची ती कल्लेवाली मिशी लोपली पार ॥ ४ ॥

नित्य हतानें दाढी घोटिती न्हावी बनले फार ।
आईबाप जरी छाती वरती क्षौरी प्रीति फार ॥ ४ ॥
आव्यापाव्या मर्द खोखोचा त्यास कंटाळा फार ।
टेनिस कोर्टी झळकती झारे अभ्यान्यांचे ते फार ॥६॥
जुगार जुव्वा खेळण्यासी अडवे येते सरकार ।
बिलियर्डचा परी रेसिसचा तो छंद वाढला फार ॥७॥
कोंबडी अंडी ब्रँडी लागे बर्फहि थंडागार ।
ग्लास झोकुनि धर्मावरती गप्पा मारिती फार ॥ ८ ॥
दुधा तुपाचा काळ संपला चहाचाच बेपार ।
अशक्तांचा नामर्दांचा भरलासे दरबार ॥ ९ ॥
एकादशीचे उपोषणाला चहा लागतो प्यार ।
सुटून गेला फलहारची तो चहाचाच अहार ॥१०॥
अजिबाईचे सोळे पळाले गंगो झाले टार ।

४

चहा वाचुनि चाले न बोले काम कसे होणार ॥११॥
धर्म भ्रष्टता त्यामध्यें नाहीं बिटाळ ना उरणार ।
जात पातना पुसु आम्ही तो कुणाचाही पिणार ॥१२॥
मोक्ष प्राप्तिची गुरू किल्ली ही तुम्हा कशी कळणार ।
चहा मुळें ते पितरची माझे स्वर्गासी चढणार ॥१३॥
दुग्ध अहार तो पचतच नाहीं अन्न कसे पचणार ।
शक्ती नाहीं मनगटी तुमच्या राज्य कसे करणार ॥१४॥
फंड गुंड या लुच्यांचा हा भरलासे दरबार ।
देश भक्तिच्या नांवा वरती पैसे खाती फार ॥१५॥
या गांवचे पुढारी आम्ही जाणा तें निर्धार ।
ऐन प्रसंगी फिरवून पगडी घेऊं आम्ही माघार ॥१६॥
पैका आम्ही पुरवू तुम्हा नाही त्याची दरकार ।
परी हातुन पै सुटेना लुच्यांचा बाजार ॥१७॥

कज्जे दलालची फार माजले जगती अपरंपार ।
अपसा मध्यें क्षुज लावूनी नाडती हो अनिवार ॥१८॥
तुझी केस ती जिंकुन देईन नको करूं कुरकुर ।
परी अधी तों पैका देइ ना तर चल हट दुर ॥१९॥
पक्षकार हा मरो वा जगो नाही मला दरकार ।
कोर्टाने तों निकाल दिधला त्यास काय करणार ॥२०॥
आपिला मध्यें खास जिंकीन आहे मला आधार ।
खालच्या कोर्टानें केला घोटाळा चांदरात झडणार ॥२१॥
एल् सी पी एस् वा एम् बी बी एस् चे डाक्तर झाले फार ।
नाका डोळ्याचे स्पेशालिष्ट ते भटकती दारोदार ॥२२॥
नाडी परीक्षा कारितां येना रोग कसे कळणार ।
रोगी सांगतो लिहूनी घेतो नंतर औषधोपचार ॥२३॥
व्हिजीट वाजूनी पाय निघेना जोडी घे कलदार ।

भूत दयेचा माणुसकीचा असाच का? व्यवहार ॥२४॥
कुलस्त्रियांचा पदर घेई खांद्याचा आधार।
भाड भीड मर्यादा गेली रंभेचा अवतार ॥ २५ ॥
गंधर्ववेश त्या नित्य अनुसरती नाटकीं प्रीती फार।
कुंकुम टिकली फुगे पाहुनि वेश्या घेती माघार ॥२६॥
सरळ भांग तो लोपुनि गेला चाळ्यांचा भडिमार।
सधवा किंवा विधवा आहे कोणाला कळणार ॥२७॥
पुरुषी शिक्षण मिळता त्यासी आवडे न संसार।
समानतेचा हक्क दावुनि काडीमोड करणार ॥ २८ ॥
वरसंशोधन हवे कशाला माझी मीच मुखत्यार।
जातिभेद तो मानित नाही प्रेमपात्र होणार ॥ २९ ॥
मास्तरीण वा नर्स होउनि स्वतंत्र मी राहणार।
समाजास मी चकित करोनि हाटेलांत जेवणार॥३०॥

१

हिंदु संघटण करण्यासाठी पडते मारामार ।
एकाजागी खाती सारे ब्राह्मण क्षत्रिय म्हार ॥ ३१ ॥
अस्पृशतेचा विषयच निघतां शास्त्रांचा भडिमार ।
विधर्मीयानां करी धरोनि देताती शेजार ॥ ३२ ॥
जाती मध्यें धर्मरक्षणीं वाद माजतो फार ।
हॉटेलामध्यें दिवसा-ढवळ्या होतो गोल्कार ॥ ३३ ॥
भराभर ते शेर खपवुनि करीन मी व्यापार ।
कंपनी काढुनी जगता बुडविन होइन मग नादार ३४
स्वतंत्रतेचे शाहीर आम्ही कोण अम्हा अडविणार ।
खड्या सुराची थाप डफावर देउन गाणें गाणार॥३५
सुधारणा ही शिखरा गेली खाली कधीं येणार ।
प्रल्हादाचा सवाल हाकीं जागृति कधीं होणार॥३६॥

—※—